पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे-४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/१७७/२०१६
दिनांक - २६/ ४/२०१६

प्रति,
मा.श्री./श्रीम. -------------------------------

सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- ४४

**विषय:- अ प्रभाग समितीची** विशेष सभा शुक्रवार
दिनांक २९/०४ /२०१६ **रोजी आयोजित केलेबाबत..** .

**महोदय/महोदया**,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची विशेष सभा शुक्रवार दिनांक २९/०४/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. आपण सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**अ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक २**

**दिनांक:- २९/०४/२०१६** **वेळ: दुपारी ११.०० वाजता**

........................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे एप्रिल २०१६ ची विशेष सभा शुक्रवार दिनांक २९/०४ /२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

| | |
|---|---|
| विषय क्र. १ | अ क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य विभागाकडील पत्र क्रमांक अक्षेका/आर/कावि/२१६ /२०१६ दिनांक २५/४/२०१६ रोजीचा स्वच्छ भारत मिशन ( नागरी ) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत प्रभाग हगणदारी मुक्त जाहिर करणे बाबतचा प्रस्ताव.<br><br>केंद्र शासनाने दिनांक 2 ऑक्टोंबर 2014 ते 2 ऑक्टोंबर 2019 या पाच वर्ष कालावधीसाठी म्हणजेच महात्मा गांधींचे 150 व्या जयंतीपर्यंत स्वच्छ भारत मिशन (नागरी) राबविणेची घोषणा केली आहे. याच धर्तीवर राज्य शासनाने स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) राबविणेचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत राबविणेत येत असलेल्या स्वच्छतेच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करणेची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची म्हणजेच महानगरपालिकांची आहे. त्यानुसार शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचना स्वच्छतेचे विविध उपक्रम राबविणेत येत आहेत. यामध्ये नागरिकांचे सहकार्याने सार्वजनिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व शहर हगणदारीमुक्त करणे याचा समावेश आहे.<br>मा. संयुक्त सचिव तथा मिशन निदेशक (एस.बी.एम.) शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. डी.ओ.क्र. Z-11021/04/2016-SBM-II Dt. 2/3/2016 व 16/3/2016 तसेच MD-SBM/AA/22/2016 Dt. 17/3/2016 नुसार शहर / वॉर्ड हगणदारीमुक्त जाहिर करणे व त्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती याबाबत कळविली आहे.<br>**व्याख्या -** A city / ward is notified as ODF city / ward if , at any point of the day, not a single person is found defecating in the open. (हगणदारीमुक्त शहर/वॉर्ड जाहिर करताना शहरात/ वॉर्डात दिवसात कधीही एकही व्यक्ती उघड्यावर शौच करताना आढळणार नाही. )<br>**यासाठी खालील बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे.**<br>1. सर्व कुटुंबांना शौचालय बांधणेसाठी जागा उपलब्ध असली पाहिजे किंवा त्यांनी शौचालय बांधलेले असावे.<br>2. कुटुंबांकडे शौचालय बांधणेसाठी जागा उपलब्ध नाही त्यांचेसाठी 500 मीटर अंतरापर्यंत सामुदायिक शौचालयाची व्यवस्था उपलब्ध असली पाहिजे.<br>3. सर्व बाजारपेठा / व्यवसायिक ठिकाणांसाठी 1 कि.मी. पर्यंतचे अंतरात सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध असली पाहिजे.<br>4. शहरात उघड्यावर शौच करणा-यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याची तरतुद असली पाहिजे.<br><br>या बाबींची पुर्तता होत असलेबाबत संबंधित प्रभाग/वॉर्डमधिल शाळा/ महाविद्यालयाकडून त्यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळेत/ महाविद्यालयात तसेच त्यांचे घरी स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध असून ते नियमितपणे त्याचा वापर करतात व ते उघड्यावर शौचास जात नसलेबाबत स्वयंघोषणापत्र ( Self declaration form ) भरुन घेणे तसेच वॉर्डातील Self Help Groups ( बचतगट ) यांचेकडून त्यांचे बचत गटातील सदस्य, त्यांचे कुटुंबीय तसेच परिसरातील नागरिक यांचेसाठी त्यांचे घरी स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच ज्यांचे |

| | |
|---|---|
| | घरी वैयक्तीक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही त्यांचेसाठी सामुदायिक स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध असून ते नियमितपणे त्याचा वापर करतात. त्यांचे पाहणीत त्या प्रभागातील कोणीही नागरिक उघड्यावर शौचास जात असल्याचे आढळून येत नसलेबाबत स्वयंघोषणापत्र ( Self declaration form ) भरुन घेणे.<br><br>उपरोक्त प्रमाणे स्वयंघोषणापत्र ( Self declaration form ) प्राप्त झालेनंतर तसा ठराव संबंधित शहर प्रशासनाने संमत करावा. याबाबत नागरिकांच्या हरकती / feedback 15 दिवसात मागवाव्यात व कालावधीत योग्य हरकती प्राप्त झाल्या नसतील तर अंतिम ठराव संमत करुन तो राज्य शासनास सादर करावा. त्यानुसार टप्प्या- टप्प्याने प्रभाग / वॉर्ड व संपुर्ण शहर दिनांक 2 ऑक्टोंबर 2017 पर्यंत हगणदारीमुक्त करणेचे उद्दीष्ट आहे. पहिल्या टप्प्यात 30 एप्रिल 2016 पर्यंत प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाकडील २-२ निवडणूक प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर करणेत येणार आहेत. त्यानुसार अ-क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. 15 (दत्तवाडी) व प्रभाग क्र. 17 (संतततुकाराम उद्यान) पहिल्या टप्प्यात हगणदारीमुक्त जाहिर करणे प्रस्तावित करणेत येत आहे. **यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.**<br><br>1. प्रभाग क्र. 15 (दत्तवाडी) मधिल 3 व प्रभाग क्र. 17 (संतततुकाराम उद्यान) मधिल 11 शाळा/ महाविद्यालयांचे प्रतिनिधींची क्षेत्रीय कार्यालय स्तरावर बैठक घेवून त्यांना सदरचे उपक्रमातील त्यांचा आवश्यक असलेला सहभाग याबाबत माहिती देवून त्यांचेकडून स्वयंघोषणापत्र ( Self declaration form ) प्राप्त करुन घेणेत आले.<br><br>2. प्रभाग क्र. 15(दत्तवाडी) व प्रभाग क्र. 17 (संतततुकाराम उद्यान) मधिल महिला बचतगटांशी संपर्क साधून त्यांना सदरचे उपक्रमातील त्यांचा आवश्यक असलेला सहभाग याबाबत माहिती देवून त्यांना स्वयंघोषणापत्र ( Self declaration form ) देणेची विनंती केली. त्यानुसार प्रभाग क्र. 15 (दत्तवाडी) मधिल १९ व प्रभाग क्र. 17 (संतततुकाराम उद्यान) मधिल 13 महिला बचत गटांकडून स्वयंघोषणापत्र (Self declaration form ) प्राप्त झाली आहेत.<br><br>वरील प्रमाणे शाळा/ महाविद्यालये व Self Help Groups ( बचतगट ) यांचे स्वयंघोषणापत्र ( Self declaration form ) नुसार तसेच या भागात म.न.पा. मार्फत करणेत आलेल्या पाहणीमध्ये नागरिक उघड्यावर शौच करीत असल्याचे आढळून येत नाहीत. त्याच प्रमाणे सदर वॉर्डात नागरिकांकडे स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध आहे. ज्या नागरिकांकडे वैयक्तीक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही त्यांचेसाठी 500 मी. पर्यंतचे अंतरामध्ये सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. बाजारपेठांचे भागात 1 कि.मी. अंतरामध्ये सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे.<br><br>उपरोक्त प्रमाणे प्रभाग क्र .15 (दत्तवाडी) व 17(संतततुकाराम उद्यान) या प्रभागांमध्ये नागरिक उघड्यावर शौचास जात असल्याचे दिसून येत नाही .यास्तव प्रभाग क्र .15 (दत्तवाडी) व प्रभाग क्र . 17(संतततुकाराम उद्यान) प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर करणेसाठी मान्यता देणेबाबत विचार करणे . |

सही/-

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
क्रमांक अक्षेका/११/कावि/१७७ /२०१६, दि. २६ एप्रिल २०१६